# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२-०४-२०१३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १२-०४-२०१३ रोजी (का.प. क्र. १०)मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.२५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.हर्षदिप कांबळे ,भा.प्र.से.,नगरसचिव श्री.ओ सी सिरसाट तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास

२. स.स. श्री. विकास रतनलाल जैन

३. स.स. श्री. वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव

५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष

६. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे

७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद

८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास

९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी

१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल

११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव

१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर

१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश

१५. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु

१६. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव

१७. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते

१८. स.स.श्री.घोडिले आनंद राधाकिसन

१९. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत

२०. स.स.श्री.चौधरी संजय सांडू

२१. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२२. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२३. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास

२४. स.स.श्रीमती जरीना म.जावेद

२५. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
२६. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२७. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२८. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२९. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३०. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३१. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३२. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३३. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३४. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३५. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३६. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४२. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४३. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४४. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४५. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
४६. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४७. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
४८. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
४९. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
५०. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
५१. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५२. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५३. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
५४. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
५५. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल
५६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद

५७. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे

५८. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

५९. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने

६०. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

६१. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

६२. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम

६३. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

६४. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

६५. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

६६. स.स.श्री.खान अक्रम करीम खान

६७. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार

६८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

६९. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

७०. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७१. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश

७२. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

७३. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

०३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

**०४.** श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

**०५.** श्री. अभिजीत भास्करराव देशमुख

चर्चा :

श्री.काशिनाथ कोकाटे :चर्चा अगोदर करण्यात यावी वृत्तपत्रात पाण्याच्या व जलवाहिनीच्या संदर्भात वेगवेगळया बातम्या येत आहे त्यावर चर्चा होवून माहिती व्हावी अशी आमची मागणी आहे.

मा.महापौर :अगोदर विषय पत्रिका घेवू त्यानंतर चर्चा केली जाईल

श्री.अफसर खॉन :पाणीप्रश्न हा महत्वाच्या विषयावर चर्चा करायची आहे लाखो करोडोचे विषय होत आहे लाखोचा भ्रष्टाचार, या विषयी आम्हाला बोलायचे अगोदर चर्चा करावी

मा.महापौर :काही विषय आहे ते मंजूर झाल्यानंतर लगेच चर्चा घेवू

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.गिरजाराम हाळनोर :विषय पत्रिका अगोदर घ्यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :शहरात पाण्याचा प्रश्न ज्वलंत आहे. समांतर जलवाहिनीच्या संदर्भात उलटसुलट चर्चा येते सिडको हडको भागात पाणीपुरवठा विस्कळीत

झाला पाण्याचा विषय महत्वाचा संमातर जलवाहिनीच्या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे यापेक्षा महत्वाचा विषय दुसरा असू शकत नाही.१२-१३ लक्ष लोकसंख्येचा प्रश्न निर्माण झाला १-२ लक्षचे अंदाजपत्रक मंजूर केले जात नाही. ती कामे समांतरच्या कामामध्ये समावेश केली. असे सांगितले जाते.

मा.महापौर :पाण्याचा विषयही महत्वाचा आहे विषय पत्रिका झाल्यानंतर आपण चर्चा घेणार आहोत.

श्री.काशिनाथ कोकाटे :पाण्याचा विषय अत्यंत महत्वाचा आहे त्यावर चर्चा करावी.आमच्या वार्डात पाणी येत नाही. पाणी पुरवठयाची कामे होत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :समांतर जलवाहिनीचा विषय महत्वाचा आहे यावर आम्हासही बोलायचे आहे. परंतु अगोदर विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतरचा अर्थकारणाचा विषय वेगळा होईल येथे पाण्याचा विषय ज्वलंत झाला त्यावर बोलायचे आहे.

श्री.खाजा शरफोद्दीन :पाण्यावर चर्चा करावी हा विषय महत्वाचा आहे.

श्री.प्रमोद राठोड :वृत्तपत्राच्या माध्यमातून आम्ही वाचतो समांतर जलवाहिनीच्या माध्यमातून शहराला पाणीपुरवठा होणार होता मा.आयुक्तांनी संबधीतास नोटीस दिली आहे तसेच विधान सभेत यावर काही घोषणा झाली आहे.या संदर्भात सर्व माहिती दयावी तोपर्यत कामकाज चालू देणार नाही. आम्हाला लोकांना उत्तर दयावे लागते.

मा.महापौर :पाण्याचा विषय महत्वाचा आहे विषय पत्रिका झाल्यानंतर चर्चा घेवू.

श्री.प्रमोद राठोड :समांतर जलवाहिनीचे ठेकेदारामध्ये भांडण चालू आहे आम्ही वृत्तपत्रातून वाचतो कशामूळे हे सर्व चालू आहे.यात प्रशासनाची भुमिका काय त्यांना काय अधिकार दिले होते सर्व माहिती दयावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत होते.

श्री.किशोर नागरे :विषय पत्रिका घ्यावी त्यानंतर चर्चा करण्यास वेळ द्यावा.

श्री.प्रमोद राठोड :समांतरच्या बाबतीत काय चालू आहे.प्रशासनाचा खुलासा घेण्यात यावा

मा.महापौर : आता विषय पत्रिकेला सुरूवात होत आहे.

या वेळी अनेक स.सदस्य डायस समोर एकाच वेळी बोलत असतात.

मा. महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**विषय क्रमांक २०५:**

दिनांक १९.०१.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५) व दिनांक ११.०२.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव:**

दिनांक १९.०१.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०५) व दिनांक ११.०२.२०१३ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक २०६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जगद्गुरु नरेंद्र महाराज हे सत्संगच्या वतीने विविध शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच गोर - गरिबांना सायकल, शिलाई मशीन वाटप, संगणक प्रशिक्षण इत्यादी जनहितार्थ करत असतात. दिनांक १९.०३.२०१३ रोजी जगद्गुरु नरेंद्र महाराज यांचा

सत्संग रतनपुर खुलताबाद येथे आहे. त्याप्रसंगी असंख्य भक्तगन, नागरीकांची, समाजसेवकांची मोठया प्रमाणात उपस्थिती रहाणार आहे.

तरी तेथे काहीही दुर्घटना घडु नये म्हणुन अग्निशामन विभागाची गाडी कर्मचाऱ्यासह दिनांक १८.०३.२०१३ रोजी सांय पासुन ते दिनांक १९.०३.२०१३ पर्यंत मोफत उपलब्ध करुन देण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.गादगे विरभद्र रामलींग,श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल,श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
अनुमोदक : श्री.नागरे किशोर बाबुराव, श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत,
श्री. जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक १९.०३.२०१३ रोजी जगद्गुरु नरेंद्र महाराज यांचा सत्संग (खुलताबाद) येथे असून त्याप्रसंगी असंख्य भक्तगन, नागरीकांची, समाजसेवकांची मोठया प्रमाणात उपस्थिती रहाणार असल्याने तेथे काहीही दुर्घटना घडु नये म्हणुन अग्निशामन विभागाची गाडी कर्मचाऱ्यासह दिनांक १८.०३.२०१३ रोजी सांय पासुन ते दिनांक १९.०३.२०१३ पर्यंत मोफत उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २०७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालया (घाटी हॉस्पीटल) मध्ये रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना व इतरांना पाणी पिण्यासाठी माझ्या स्वेच्छा निधीतून तीन वॉटर कुलर्स बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी. रु ७५०००/- च्या मर्यादेपर्यंत करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती हेमलता प्रकाश मुगदीया अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी हॉस्पीटल) मध्ये रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना व इतरांना पाणी पिण्यासाठी माझ्या स्वेच्छा निधीतून तीन वॉटर कुलर्स बसविण्याची कार्यवाही रु ७५०००/- च्या मर्यादेपर्यंत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २०८:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्रभागातील गरजु व होतकरु मागासवर्गीय महिलांना माझ्या स्वेच्छानिधी मधून शिलाई मशीन उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदरील उपक्रमासाठी माझ्या स्वेच्छानिधीमधून रु १.०० लाख मर्यादेपर्यंतचा खर्च करण्यात यावा.करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. बनकर कृष्णा सांडुजी
अनुमोदक :श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण,श्री.कुचे नारायण तिलोकचंद

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माझ्या प्रभागातील गरजु व होतकरु मागासवर्गीय महिलांना माझ्या स्वेच्छानिधी मधून शिलाई मशीन उपलब्ध करुन देण्यास व सदरील उपक्रमासाठी माझ्या स्वेच्छानिधीमधून रु १.०० लाख मर्यादेपर्यंतचा खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २०९:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र ७०, अंतर्गत असलेल्या अभिषेक अपार्टमेंटच्या पाठीमागे, सुरज अपार्टमेंटच्या जवळ, मल्हार चौकाच्या बाजुला महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा आहे. सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी देणे

बाबत तेथील नागरिक श्री.मंत्री, श्री.देशपांडे, श्री.सिफानी, श्री.खंडेलवाल, श्री.करवा इत्यादींची मागणी आहे. सदरील जागेची निगा स्वखर्चाने राखण्यास नागरिक तयार आहेत. तसेच सदरील जागेवर अतिक्रमण होऊ नये अथवा त्याचा गैरवापर होऊ नये या दृष्टीकोनातून सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी वापरण्यास नागरिकांना देण्याबाबतचा प्रस्ताव सादर. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र ७०, अंतर्गत असलेल्या अभिषेक अपार्टमेंटच्या पाठीमागे, सुरज अपार्टमेंटच्या जवळ, मल्हार चौकाच्या बाजुला महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा तेथील नागरिकांच्या मागणी नुसार व सदरील जागेची निगा स्वखर्चाने तेथील नागरीक राखण्यास तयार असल्याने सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी नागरीकांना वापरण्याकरिता देण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र ७०, अंतर्गत महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा आहे. सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी देणे बाबत तेथील नागरिक महिलांची मागणी आहे. सदरील जागेची निगा स्वखर्चाने राखण्यास नागरिक तयार आहेत. तसेच सदरील जागेवर अतिक्रमण होऊ नये अथवा त्याचा गैरवापर होऊ नये या दृष्टीकोनातून सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी वापरण्यास नागरिकांना देण्याबाबतचा प्रस्ताव सादर.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव अनुमोदक : श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र ७०, अंतर्गत महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागा असून सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी देणे बाबत तेथील नागरिक महिलांची मागणी केली असल्याने व सदरील जागेची निगा स्वखर्चाने राखण्यास तेथील नागरिक तयार असुन सदरील जागा विविध कार्यक्रमासाठी तेथील नागरीकांना वापरण्याकरिता देण्यास मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मराठवाडासह संपुर्ण महाराष्ट्रात पावसा अभावी दुष्काळ पडलेला आहे. पाण्याची अत्यंत बिकट अवस्था आहे. औरंगाबाद शहरात पीण्याच्या पाण्याचा तुटवडा पडत आहे. नागरीकांना पीण्याचे पाणी मिळविण्यासाठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत शहरातील काही व्यक्ती मार्फत शहरातील विहीरी व विंधन विहीरी मधुन भरमसाठ पाणी उपसा करुन व्यवसाय करत आहेत तसेच मोठया प्रमाणावर पाण्याचा अपव्यय करण्यात येत आहे. त्यामुळे परिणामी भुजल पातळी अत्यंत खाली गेली आहे. त्यासाठी भुजल विकास आणि व्यवस्थापन कायदा १९९३ हा कायदा अस्तीत्वात आहे. या कायद्यानुसार ग्रामस्थ / नागरीक तक्रार करतात ग्रामपंचायत ही तक्रार तहसिलदाराकडे दाखल करतात तहसिलदार भुजलसर्वेक्षक विकास यंत्रणेमार्फत कार्यवाहीकरुन पाण्याचा भरमसाठ उपसाकरणारे विंधन विहीर, विहीर अधिग्रहन करतो या आधारावर महानगरपालिकेने नियमावली तयार करुन उन्हाळयात पाण्याचा भरमसाठ उपसा करुन विक्री करणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

सुचक : श्री.केनेकर संजय किसनराव, श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत

अनुमोदक : डॉ.खान जफर अहेमद, श्री.अफसरखान यासीन खान

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात पीण्याच्या पाण्याचा तुटवडा पडत असल्याने अशा परिस्थितीत शहरातील काही व्यक्ती मार्फत शहरातील विहीरी व विंधन विहीरी मधुन भरमसाठ पाणी उपसा करुन व्यवसाय करत असून मोठया प्रमाणावर पाण्याचा अपव्यय करण्यात येत असून भुजल पातळी अत्यंत खाली गेली असल्याने भुजल विकास आणि व्यवस्थापन कायदा १९९३ हा कायदा अस्तीत्वात असून या कायद्यानुसार महानगरपालिकेने नियमावली तयार करुन तसेच उन्हाळयात पाण्याचा भरमसाठ उपसा करुन विक्री करणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २१२ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रं.७५ मधील रहिवाश्यांच्या सुविधेसाठी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्रं व अ.क्रं | २०१२-२०१३ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| वार्ड-इ<br>स्पील-११०<br>अ.क्र.०८ | भांडवली जलनि:सारण कामे<br>०१. वार्ड क्रं.७५ संजयनगर-मुकूंदवाडी येथील लहानगल्ल्यातील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन बदलणे.<br>आर्थिक तरतुद १०.०० लक्ष रुपये. | ०१.वार्ड क्रं.७५ तान्हाजीनगर सिडको येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे या कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष वळती करणे<br>०२. वार्ड क्रं.७५ अंतर्गत धम्मचौक येथील रस्ते सिमेंट कॉंक्रेटचे करणे<br>या कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष वळती करणे. |

सुचक : श्री.बाळुलाल वरदाजी गुजर अनुमोदक : श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्रं.७५ मधील रहिवाश्यांच्या सुविधेसाठी खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रं व अ.क्रं | २०१२-२०१३ मधील लेखाशिर्ष | या कामासाठी वळती करणे |
|---|---|---|
| वार्ड-इ<br>स्पील-११०<br>अ.क्र.०८ | भांडवली जलनि:सारण कामे<br>०१. वार्ड क्रं.७५ संजयनगर-मुकूंदवाडी येथील लहान गल्ल्यातील विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन बदलणे.<br>आर्थिक तरतुद १०.०० लक्ष रुपये. | ०१.वार्ड क्रं.७५ तान्हाजीनगर सिडको येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ता तयार करणे या कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष वळती करणे<br>०२. वार्ड क्रं.७५ अंतर्गत धम्मचौक येथील रस्ते सिमेंट कॉंक्रेटचे करणे<br>या कामासाठी रक्कम रुपये ०५.०० लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २१३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिके मार्फत मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीची मोहिम चालु आहे. या मोहिमे दरम्यान नागरिकांशी समन्वय साधुन नागरिकांकडून कर वसुली करणे आवश्यक आहे. कारण यापुर्वी नागरिकांना पाच पाच वर्ष करांच्या नोटीस दिलेल्या नाहीत व अचानक फेब्रवारी/मार्च महिन्यात कर भरण्याचा तो णए६ दही २४ ते ४८

तासात भरण्याचा तगादा लावणे, अशावेळी नागरिकांशी समन्वय साधून कौशल्याने कर वसुल करणे आवश्यक आहे.

तथापि श्रीमती प्रियंका केसरकर हया नागरिकांशी अरेरावीने वागतात, नागरिकांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे, धमकी देणे असे प्रकार करतात अशा तक्रारी आहेत. त्यांच्या हया वागणुकीमुळे त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या रोषास सामोरी जावे लागत आहे.

करिता वरील सर्व बाबींचा विचार करुन श्रीमती प्रियंका केसरकर यांची महापालिकेतून बदली करुन त्यांना त्यांच्या मुळ ठिकाणी परत पाठविण्यात यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत, श्री.बारवाल गजानन रामकिसन

अनुमोदक :श्री.जोशी संजय रामदास, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,श्री. कुलकर्णी गोपाळ शरदराव, श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव,डॉ.खान जफर अहेमद,श्री. मालानी प्रफुल लालचंद श्री.माळवतकर महेश शिवाजीराव, श्रीमती सुरे सविता संतोष, श्री.गादगे विरभद्र रामलींग श्री.बन्सी ग्यानु जाधव, श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती प्रियंका केसरकर यांची महापालिकेतून बदली करुन त्यांना त्यांच्या मुळ ठिकाणी परत पाठविण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २१४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १९ जानेवारी २०१३ व ११ फेब्रुवारी २०१३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.९४ नुसार नगररचना विभागाच्या सन २००९ ते २०१२ या चार वर्षाच्या काळातील गैरकारभाराची चौकशी संचालक नगररचना पुणे यांच्या मार्फत करण्याचा ठराव पारीत झाला आहे. तसेच सदरील चौकशीचा अहवाल येत नाही तोपर्यंत संबंधित विभागाचा चार्ज सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडून काढून घेऊन दुसरे अधिकारी यांच्याकडे देण्याचा निर्णय झाला आहे.

विषय क्र. ९४ सर्वसाधारण सभा दिनांक १९ जानेवारी २०१३ व ११ फेब्रुवारी २०१३ मधील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त महानगरपालिका यांनी संचालक नगररचना पुणे यांना त्यांचे गोपनिय पत्र जा.क्र.१/२०१३ दिनांक ०६/०३/२०१३ नुसार चौकशी करण्याचे कळविले आहे. आयुक्त महानगरपालिका यांनी त्यांचे गोपनिय पत्र जा.क्र. ०२/२०१३ दि. ०६/०३/२०१३ नुसार मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४८७६/२०१० मधील राज्य शासनाचा दिवाणी अर्ज क्र. १७४५८/२०१० निर्णयासाठी प्रलंबित असल्याने व त्यांच्या मते या प्रकरणात मा.न्यायालयाचा "जैसे थे" आदेश असल्याने महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंत्यास, सहाय्यक संचालक नगररचना पदावरुन कमी करणे नियमानुसार योग्य होणार नाही असे मत व्यक्त केले आहे.

करीता संबंधित अधिकाऱ्याने सहाय्यक संचालक नगररचना पदावर केलेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी त्यांना पदावरुन दुर करण्याची आवश्यकता असल्याचा तसेच या पदावर शासनाच्या अस्थापनेवरील अधिकारी कार्यरत असावा असा दिवाणी अर्ज मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.४८७६/२०१० मध्ये प्रतिवादी म्हणून आयुक्त महानगरपालिका यांनी महानगरपालिकेतर्फे दाखल करावा.

करीता वरील प्रमाणे धोरणात्मक निर्णय म्हणून ठरावास मान्यता व्हावी व ठरावाच्या मान्यतेनंतर पुढील वैधानिक कार्यवाही आयुक्त महानगरपालिका यांनी करावी. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.बनकर कृष्णा सांडुजी, श्री.गादगे विरभद्र रामलींग, श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
अनुमोदक :श्री.नागरे किशोर बाबुराव, श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव,

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १९ जानेवारी २०१३ व ११ फेब्रुवारी २०१३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.९४ नुसार नगररचना विभागाच्या सन २००९ ते २०१२ या चार वर्षाच्या काळातील गैरकारभाराची चौकशी संचालक नगररचना पुणे यांच्या मार्फत करण्याचा ठराव पारीत झाल्यानुसार संबंधित अधिकाऱ्याने सहाय्यक संचालक नगररचना पदावर केलेल्या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी त्यांना पदावरुन दुर करण्याची आवश्यकता असल्याचा तसेच या पदावर शासनाच्या अस्थापनेवरील अधिकारी कार्यरत असावा असा दिवाणी अर्ज मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.४८७६/२०१० मध्ये प्रतिवादी म्हणून आयुक्त महानगरपालिका यांनी महानगरपालिकेतर्फे दाखल करण्यास व ठरावाच्या मान्यतेनंतर पुढील वैधानिक कार्यवाही आयुक्त महानगरपालिका यांनी करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २१५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका आस्थापनेवर दैनिक वेतनावर कार्यरत असलेले कै. घनश्याम पांडुरंग जाधव हे दैनिक वेतन सुरक्षा वॉचमन म्हणून गेल्या १५ वर्षापासुन कार्यरत होते. सदर कर्मचाऱ्याचे दिनांक २९.१२.२०१२ रोजी जीभेचा कर्करोग (Tounge Cancer) या आजाराने निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व दोन मुले असून कुटूंबाचे उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांच्या पतीच्या नोकरीच्या उत्पन्नाशिवाय इतर कोणतेही साधन उपलब्ध नाही.

सदरील कुटुंबाची परिस्थिती अतिशय हालाखीची व गरीबीची असून उदरनिर्वाहाचे कुठलेही साधन उपलब्ध नाही. करिता कै.घनश्याम पांडुरंग जाधव यांची औरंगाबाद महानगरपालिकेतील १५ वर्षाची सेवा लक्षात घेता मानवतेच्या दृष्टीकोनातून व त्यांचेवर उपासमारीची वेळ येणार नाही तसेच मुलांच्या भवितव्यास हातभार लागेल या दृष्टीकोनातून त्यांची पत्नी नामे वंदना घनश्याम जाधव यांना त्यांचे शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग -४ पदावर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नोकरीत सामावून घ्यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
अनुमोदक : श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद, श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनेवर दैनिक वेतनावर कार्यरत असलेले कै. घनश्याम पांडुरंग जाधव हे दैनिक वेतन सुरक्षा वॉचमन म्हणून गेल्या १५ वर्षापासुन कार्यरत होते. सदर कर्मचाऱ्याचे दिनांक २९.१२.२०१२ रोजी जीभेचा कर्करोग (Tounge Cancer) या आजाराने निधन झालेले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व दोन मुले असून कुटूंबाचे उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांच्या पतीच्या नोकरीच्या उत्पन्नाशिवाय इतर कोणतेही साधन उपलब्ध नसल्याने त्यांची पत्नी नामे श्रीमती वंदना घनश्याम जाधव यांना त्याचे शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग-४ पदावर महानगरपालिकेच्या नियमानुसार आस्थापनेवर सामावून घेण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

(विषय पत्रिकेचे कामकाज चालू असतांना डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलत होते.)

श्री.गजानन बारवाल :विषय मंजूर केल्याबद्दल आपले अभिनंदन.

मा.महापौर :पाणी प्रश्नावर चर्चा करावी.

या वेळीही सर्व पक्षीय स.सदस्य डायस समोर एकाच वेळी बोलत असतात व एकमेकांविरूध्द घोषणा देतात गोंधळाची परीस्थिती निर्माण होते.

मा.महापौर :विषय पत्रिकेवरील विषय मंजूर झाले आहे. आता राष्ट्रगिताने सभा संपेल.

यावेळी डायस समोरील काही स.सदस्य यांनी राजदंड उचलून एक दुस-याकडे आपआपसांमध्ये ओढत होते अशा गोंधळाच्या वातावरणातच स.सदस्य श्री. प्रमोद राठोड यांचे डोक्याला इजा (जखम)होऊन त्यांना चक्कर येत असल्याने काही स.सदस्यांनी त्यांना सभागृहा बाहेर नेले.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी जाहिर केले.

**नगर सचिव**
**महानगरपालिका औरंगाबाद**

**महापौर**
**महानगरपालिका औरंगाबाद**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (१०)

## दिनांक १२/०४/२०१३ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे

**स. स. श्री बेहडे अशोक किसनराव**

**प्रश्न क्र. ४२ ते ४४**

**प्रश्न क्रमांक ४२:** दिनांक १९.०१.२०१३ च्या विषय क्र. ९४ विषय पारीत झाला माननीय आयुक्तांनी काय कार्यवाही केली?

**उत्तर :** अप्राप्त.

**प्रश्नक्रमांक ४३:** मा.खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे साहेब तसेच मा.आमदार श्री.सतिषजी चव्हाण साहेब हया दोन्ही प्रतिनीधी ए.डी.टि.पी. च्या बाबतीत पत्र व्यवहार केला मा.आयुक्तांनी या वर काय कार्यवाही केली?

**उत्तर :** अप्राप्त.

**प्रश्न क्रमांक ४४:** मा.सहाय्यक संचालक नगर रचना विभागावर नगर रचना विभागात जे.ई. व उपअभियंता हे या विभागात किती वर्षा पासून कार्यरत आहेत व नियमाने किती वर्षा मध्ये बदली झाली पाहिजे व अद्याप का झाली नाही.

**उत्तर : आस्थापना अधिकारी -१.**

| प्र.क्र. | प्रश्न | उत्तर: अ क्र | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यरत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ४४. | मा.सहाय्यक संचालक नगर रचना विभागावर नगररचना विभागात जे. ई. व उपअभियंता हे या विभागात किती वर्षापासून कार्यरत आहेत व नियमाने किती वर्षामध्ये बदली झाली पाहिजे व अद्याप का झाली नाही? | १. | श्री. ए.बी. देशमुख | उप अभियंता | २७.११.२००८ |
| | | २. | श्री. व्ही. एम. निकम | उप अभियंता | २७.११.२००८ |
| | | ३. | श्री. फईमोद्दीन सिद्दीकी | उप अभियंता | २४.०२.२०१० |
| | | ४. | श्री. नितीन गायकवाड | शाखा अभियंता | १६.१०.२०१२ |
| | | ५. | श्री. प्रभाकर पाठक | शाखा अभियंता | २०.१२.२०१२ |
| | | ६. | श्री. एन. बी.साळवे | शाखा अभियंता | ऑगस्ट-२००५ |
| | | ७. | श्री. आर. पी. वाघमारे | शाखा अभियंता | १६.०१.२०१२ |
| | | ८. | श्री. इखलास अहेमद सिद्दीकी | शाखा अभियंता | नोव्हेंबर-२००८ |
| | | ९. | श्री. संजय कोंबडे | कनिष्ठ अभियंता | १६.०१.२०१२ |
| | | १०. | श्री. बाळासाहेब शिरसाठ | कनिष्ठ अभियंता | जानेवारी-२०१० |
| | | मनपा सेवाभरती नियमामध्ये वदल्या करणेबाबत कोणतीही तरतुद नाही. तथापी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अन्वये अधिकारी/कर्मचाऱ्यांचे कर्तव्य विहित करून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. | | | |

**स.स.श्री. गायकवाड कैलास लक्ष्मण**

**प्रश्न क्र. ४५ ते ४८**

**उत्तर :- प्रकल्प संचालक, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना**

**प्रश्न क्रमांक ४५:** स.नगरसेवकांना सुवर्ण जयंती योजनेचे अर्ज केव्हा वाटप करण्यात आले त्यांची तारीख काय?

**उत्तर** : स. नगरसेवकांना सुवर्ण जयंती योजनेचे अर्ज दि ०१.१२.२०१२ पासून वाटप करण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक ४६:** स.नगर सेवक अर्ज वाटप केल्या नंतर त्यांची बँकेत शिफारस कधी करण्यात आली

**उत्तर** : स. नगरसेवकांनी शिफारस केल्यानंतर प्रकरणे बँकेत दि २३.०१.२०१३ पासुन प्रकरणे पाठविण्यात आली आहेत.

**प्रश्न क्रमांक ४७:** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत जी कर्ज प्रकरणे बँकेत पाठवण्यात आली त्याला काय निकष लावण्यात आले.

**उत्तर** : सुजयो अंतर्गत कर्ज प्रकरणे शिफारस करतांना दारीद्र्य रेषेखालील कुटूबांचे निकष लावण्यात आले आहे.

**प्रश्न क्रमांक ४८:** सुवर्ण जयंती कर्ज प्रकरण योजना कोणासाठी आहे

**उत्तर** : सुजयो योजने अंतर्गत दारीद्र्य रेषेखालील कुटूंबासाठी लाभ दिला जातो.

**स.स. श्री मुजीब खान मीर आलम खान**

**प्रश्न क्रमांक ४९ ते ५१**

**प्रश्न क्रमांक ४९**: चिश्तियॉ कॉलनी N-६ वसाहतीचे गुंठेवारी नियमाधीन करण्याकरिता स्थानिक नागरिकांनी संचिका दाखल केल्या आहेत. त्यासंबंधी मनपाच्या गुंठेवारी कक्षातुन चिश्तियॉ कॉलनी येथील वसाहतीच्या नियमाधीन करण्यासंबंधीची संचिका अद्याप प्रलंबित आहे. यासंचिकेतील कार्यवाहीची आणि संचिकेतील संपुर्ण कागदपत्रांच्या प्रतींची मला आवश्यकता आहे. करिता या संबंधी झालेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती आणि संचिकेतील कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्या.

**उत्तर** : **सहाय्यक संचालक नगर रचना**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, चिश्तीया कॉलनी एन-६, ही वसाहत सिडको अधिसुचित क्षेत्रात आहे. सिडको अधिसुचित क्षेत्रामध्ये सिडको प्राधिकरणाने त्यांचा विकास आराखडा अंमलात आणला आहे. सदरील वसाहत ही सिडको विकास आराखडा निवासापयोगी क्षेत्रात आहे. सिडकोच्या अधिसुचित क्षेत्रात ज्या जागा डी-नोटीफाईड केल्या आहेत व त्या पुर्णतः खाजगी मालकीच्या असून जागेबाबतची न्यायप्रविष्ठ प्रकरणे नाहीत. अशा जागेवरील अनाधिकृत वसाहती गुंठेवारी अधिनियमान्वये नियमीत करण्यात येतात. सिडको एन-६ भागातील चिश्तीया कॉलनी या वसाहतीचे भुमी संपादन करून सदरील जमीन सिडकोने एच.एम.टी. कंपनीस भाडे पट्टयावर वाटप केली असल्याचे सिडको कार्यालयाने त्यांच्या दि १३ डिसेंबर २००७ च्या पत्रानुसार या कार्यालयास कळविले आहे. तसेच या जागेवरील अनाधिकृत वसाहतीस गुंठेवारी अंतर्गत नियमित करण्यासाठी सिडको नाहरकत प्रमाणपत्र देऊ शकणार नाही. असेही याच पत्रामध्ये स्पष्ट कळविले आहे. तसेच सिडको विकास आराखड्यातील अधिसुचित क्षेत्र असलेल्या जमिनी सार्वजनिक प्रयोजनाकरीता संपादनाखाली असलेल्या जमिनी आहेत व सदरील जमीनीचे भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण करून सिडको प्राधिकरणाने या जमिनीचे एच.एम.टी. कंपनीस भाडे पट्टयाला वाटप सुध्दा केले आहे. करीता महाराष्ट्र

गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील कलम ३/१च्या दुसऱ्या परंतुकातील (ख) सार्वजनिक प्रयोजनाकरीता भुसंपादनाखाली असलेल्या जमिनीवर अस्तित्वात असलेले भुखंड गुंठेवारी विकास नियमाधिन करण्यास पात्र असणार नाहीत. अशी स्पष्ट तरतुद आहे. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार सदरची जमिन सिडको विकास आराखड्यातील अधिसुचित क्षेत्रातून वगळल्यास ( De Notified Area) व गुंठेवारी नियमितीकरणास मुक्त केल्यास या कार्यालयाकडून नियमितीकरणाबाबत विचार करणे शक्य होईल.

तथापी, याबाबत मा. सर्वसाधारण सभेने दि. ०९.०८.२०१२ नुसार विषय क्र ८४८ नुसार पारीत केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी या कार्यालयाने महानगरपालिकेच्या पॅनलवरील विधिज्ञांचे मत मागविले. सदरील विधिज्ञांचे मत हे हि वसाहत गुंठेवारी अधिनियमान्वये नियमित करता येणार नाही असे आहे.

त्याअनुषंगाने प्रकरणातील सर्व वस्तूस्थिती मा. आयुक्त महोदय यांना सादर केल्यानंतर त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे गुंठेवारी नियमितीकरण करता येत नसल्याचा निर्णय घेतला असून याबाबत याप्रकरणाचा पाठपुरावा करणारे विरोधी पक्षनेता डॉ. श्री. खान जफर अहमद यांना जा.क्र./मनपा/नरवि/गुंठे/८६८/२०१३ दि. १०.०४.२०१३ पत्रान्वये कळविले आहे.

सुलभ संदर्भासाठी संचिकेची छायांकीत प्रत आपल्या मागणीनुसार देण्यात येत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक ५०:</u>** आस्थापना विभागात लागलेल्या आगीमध्ये किती कर्मचाऱ्यांच्या संचिका जळाल्या या संबंधी माहिती देण्यात यावी. तसेच या आगीमध्ये ११२४ दैनिक वेतनावर काम करणाऱ्या (नंतर कायम करण्यात आलेल्या) किती कर्मचाऱ्यांच्या संचिका जळाल्या, नावासहित सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर** : अप्राप्त.

**प्रश्न क्रमांक ५१:** मनपाच्या गुंठेवारी कक्षातर्फे सन २००९ ते २०१३ पर्यंत किती संचिका दाखल झाल्या? किती संचिकाना चलन देण्यात आले? किती संचिका मंजूर झाल्या आणि कोणत्या वसाहतीमध्ये मंजूर झाल्या यासंबंधी सविस्तर माहिती देण्यात यावी. त्याचप्रमाणे मनपाच्या वार्ड कार्यालयामध्ये विशिष्ट मोहीम (शिबीर) राबवुन संकलीत करण्यात आलेल्या संचिकेपैकी किती संचिका नियमाधीन करण्यात आल्या? सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर** : अप्राप्त.

**स.स. श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल**

**प्रश्न क्रमांक ५२ ते ५६**

**प्रश्न क्रमाक ५२:** प्रभाग क्र.५९ येथील देवगीरी हौ.सोसायटी ची ओपन स्पेस (खुली जागा) कोणाची मालकीची आहे? माझ्या माहिती प्रमाणे तेथे काहि अतीक्रमण झाले आहे का?

**उत्तर : सहाय्यक संचालक नगर रचना**

प्रभाग क्रमांक ५९ मधील देवगिरी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या मंजूर रेखांकनामधील खुली जागा आहे. ही सदर संस्थेने महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. जागा महानगरपालिकेच्या हक्कात व ताब्यात आहे.

**उत्तर** : **प्रशासकीय अधिकारी-१**

महानगरपालिकेच्या इमारत निरीक्षक यांनी पाहणी व चौकशी केली असता, मनपाच्या मोकळ्या जागेवर श्री शेख निसार यांनी जळतन लाकडे टाकून अतिक्रमण केलेले आहे. तसेच काही लोकांनी ट्रक उभे केले आहे.

**प्रश्न क्रमांक ५३:** मी आतापर्यंत प्रशासकीय विभागात किती पत्र व्यवहार केले त्याची काय कार्यवाही केली व का केली नाही.

**प्रश्न क्रमांक ५४:** प्रभाग क्र.५९ देवगिरी हौ.सो.ची खुली जागेवर अतिक्रमण झाले आहे त्या संदर्भात आपल्या प्रशासकीय विभागात बरेच पत्र व्यवहार केला तरी आपण काय कार्यवाही व अद्याप का करण्यात आली नाही.

**उत्तर** : आपल्या पत्रव्यवहाराप्रमाणे मा. शहर अभियंता यांना खुल्या जागेभोवती संरक्षण भिंत बांधण्यासाठी व मालमत्ता अधिकारी यांना महानगरपालिकेची जागा या नावाचा फलक लावण्यासाठी जा.क्र./मनपा/प्र.अ.-१/९१४/२०१२ दि ०९.०७.२०१२ रोजी पत्र दिलेले आहे. मनपाच्या खुल्या जागेवर उत्तरेकडे एक खोली बांधलेली आहे व ट्रक उभे केलेले आहे. त्यासाठी गावकरी प्रेसचे श्री. पोतनिस यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० ते ४७८ अन्वये नोटीस दिलेली आहे व सदरील व्यक्ती न्यायालयात जाऊ नये म्हणून कॅव्हेट दाखल केले आहे. सदरचे अतिक्रमण व बांधकाम निष्कासित करण्यासाठी संचिका मंजुरीसाठी मा. आयुक्त यांच्याकडे सादर केलेली आहे.

**प्रश्न क्रमांक ५५:**देवगिरी हौ.सो. खोकडपुरा येथील खुली जागा संदर्भात सोसायटीची नागरीकांनी किती पत्र व्यवहार केला व आपण काय कार्यवाही केली?

**उत्तर** : स.नगरसेवक यांनी सहा पत्र दिले आहे. व देवगिरी हौ. सोसायटीचे अध्यक्ष यांनी आठ पत्रे दिले आहेत. त्यानुसार वरील प्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**प्रश्न क्रमांक ५६:** तात्कालीन आयुक्त श्री.पुरषोत्तम भापकर यांनी प्रशासकीय अधिकारी यांना देवगिरी हौ.सो. संबंधीत काय आदेश केले त्यांची अमलबजावणी केली का व का नाही केली

**उत्तर** : तात्काळ तपासून सादर करा असा अभिप्राय दिलेला आहे. त्याप्रमाणे प्रशासकीय विभागाने अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे.

**स.स.श्री.शिंदे राजू रामराव:**

**प्रश्न क्रमांक ५७:** मनपा हद्दीतील मनपा संबंधित नसतांना खेळा संबंधी किंवा कोणत्याही प्रकारचा अपघात होतो, त्या अपघातग्रस्तांना मनपा तर्फे मदत करतो ती मदत कोणत्या नियमाआधारे करतो व कोणत्या लेखाशिर्षामधुन करण्यांत येते. याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**उत्तर** : **अप्राप्त.**

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

महापौर
महानगरपालिका औरंगाबाद